गावो रक्षति रक्षितः
महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते

**राज्यमंत्री दर्जा**
**अध्यक्ष, महाराष्ट्र गोसेवा आयोग,**
यांचे कार्यालय
महाराष्ट्र शासन
औंधपुणे, – ४११०६७
cah.gosevaayogmh@mah.gov.in

## गोपाष्टमीचा आनंद साजरा करा !

भारतीय संस्कृतीत पहिला गोपालक म्हणजे गोविंद, तोच श्रीकृष्ण. कार्तिक शुक्ल अष्टमीच्या दिवशी कृष्ण आणि बलराम यांना गोपालनासाठी नंदराजाने गोशाळेत पाठविले आणि तिथूनच खऱ्या अर्थाने गोसेवेची परंपरा सुरु झाली. याच दिवशी नंद सुताने इंद्र देवाकडून होणाऱ्या अतिवृष्टीचा मारा सरळ गोवर्धन पर्वत उचलून गोवंश आणि गोपालकांची सुरक्षितता घडवली आणि अशा आपत्ती निवारणामुळेच इंद्रदेवाने प्रसन्न होऊन आपला कोप शांत करत पुन्हा गोकुळाला वैभवी वातावरण प्रदान केले, अशी आपल्या मनातील श्रद्धा गोसंवर्धनासाठी पुनश्च प्रोत्साहित करण्यास पूरक ठरते.

महाराष्ट्रात गेल्या सहा महिन्यात झालेली अतिवृष्टी आणि गोसांभाळात असणाऱ्या प्रत्येक अडचणींची तीव्रता गोपाष्टमीच्या निमित्ताने पराभूत, दुर्लक्षित, वगळणी करत गोपूजन, गोसेवा, गोमाहात्म्य, गो सद् भाव, गोमहोत्सव, गोविकास अशाप्रकारे मानसिक उभारीसाठी सर्वांसाठी आवश्यक ठरणार आहे. राज्यातील देशीगोवंश बाबत सन्मानाने विकास घडवण्यासाठी पुन:श्च कटीबद्ध होण्यास गोपाष्टमी नवीन ऊर्जा, चेतना आणि उभारी ठरणार आहे. विज्ञान युगात गोसंवर्धनाच्या माध्यमातून नैसर्गिक प्रतिकूलतेवर मात तर शेती- कुटुंब- समाज क्षेत्रात आरोग्य उंचावण्यासाठी सार्वत्रिक प्रयत्नांची गरज आहे, म्हणूनच गोपाष्टमीचे महत्व अधिक स्पष्ट होते.

राज्यात नैसर्गिक शेतीसाठी चालना देणारी प्रशासकीय यंत्रणा गतिमान होण्याचे संकेत दीपावलीच्या निमित्ताने आपल्या सर्वांपर्यंत पोहोचले आहेत, यासाठी देशी गोवंश संवर्धन आणि विकास हा पाया गोशाळांनी बळकट करणे अत्यंत अनिवार्य आहे. महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या माध्यमातून राज्यातील गोशाळांचे सक्षमीकरण विविध माध्यमातून प्रत्यक्षात घडवण्यासाठी आटोकाट प्रयत्न सुरू आहेत. आपल्या सर्वांची देशी गोवंश विकासाची प्रेरणा गोपाष्टमीच्या निमित्ताने अधिक दृढ होवो आणि आत्मनिर्भर गोपालनातून राज्यात गोकुळाचा आनंद वर्षाव सातत्याने घडो, अशी अपेक्षा आहे.

राज्यातील सर्व गोशाळा संचालकांचे कायमस्वरूपी सहकार्य तांत्रिक, प्रशासकीय आणि विकासात्मक कार्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाला सातत्याने लाभले असून यापुढेही ते प्रत्येक उपक्रमात स्पष्ट दिसून येईल याची खात्री आहे. गोपाष्टमीच्या निमित्ताने आपण निर्धारित केलेले सर्व नाविन्यपूर्ण आणि कौशल्ययुक्त उपक्रम आयोगाला पुढील दिशा सुनिश्चित करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहेत. कृपया गोपाष्टमीच्या निमित्ताने साजरा होणारा आपल्या गो शाळेतील आनंदोत्सव आयोगाकडे प्राप्त झाल्यास आनंदच द्विगुणित होईल.

गोपाष्टमीच्या शुभेच्छांसह आपल्या प्रतिसादाच्या अपेक्षित

**श्री. शेखर मुंदडा**
**अध्यक्ष- महाराष्ट्र गोसेवा आयोग, पुणे**